२८

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यामधील
पदाधिकाऱ्यांसाठी स्वीय कर्मचारी वर्ग....

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय क्र. एपीटी १०९४/प्र.क्र. १३४६/१३,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ३ एप्रिल १९९७.

शासन निर्णय :-

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यामधील पदाधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वीय कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. ही बाब विचारात घेऊन जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यामधील लिपिकवर्गीय कर्मचारी वर्ग आकृतिबंधामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी नेमलेल्या समितीने त्यांच्या अहवालामध्ये या पदाधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र स्वीय कर्मचारी वर्ग देणे व त्यांच्या कार्यालयीन कामकाजाबाबत काही शिफारशी केल्या होत्या आणि सदरहू शिफारशी शासनाच्या विचाराधीन होत्या.

आदेश

२. या बाबत विचार करून शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

१] जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यामधील पदाधिकाऱ्यांसाठी स्वीय कर्मचारी वर्ग पुढील प्रमाणे राहील.

[अ] जिल्हा परिषदेचे अध्यक्षासाठी.

| | |
|---|---|
| [ एक ] उच्चश्रेणी लघुलेखक | १ |
| [ दोन ] वरीष्ठ सहाय्यक [ लिपिकवर्गीय ] | १ |
| [ तीन ] परिचर | २ |
| एकुण | ४ |

[ब] जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व विद्यमान चार विषय समित्यांचे सभापती यांच्यासाठी प्रत्येकी.

| | |
|---|---|
| [ एक ] वरिष्ठ सहाय्यक [ लिपिक वर्गीय ] | १ |
| [ दोन ] परिचर | २ |
| एकुण | ३ |

[क] पंचायत समित्यांचे सभापती व उपसभापती यांच्यासाठी प्रत्येकी

| | |
|---|---|
| [ एक ] कनिष्ठ सहाय्यक | १ |
| [ दोन ] परिचर | १ |
| एकुण | २ |

२] जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष ज्या विषय समितीचे सभापती असतील त्या सभापतीसाठी स्वतंत्र स्वीय कर्मचारी वर्ग दिलेला नाही. तरी अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्यासाठी दिलेले कर्मचारी वर्ग ते ज्या विषय समितीचे सभापती असतील त्या सभापतीचे देखील स्वीय कर्मचारी म्हणून काम करतील.

..२/-

पंचायत समिती बेंगवाडी
कार्यालय ... 21 APR 1997
ग. वि. अ.
२०५२ २२-४-९७
सभापती पंचायत समिती बेंगवाडी

३] जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या पदाधिका-यांना वरील प्रमाणे लागणा-या कर्मचारी वर्गासाठी वेगळ्याने पदे मंजूर केलेली नाही म्हणून जिल्हा परिषदांच्या सर्व पदाधिका-यांसाठी देण्यात आलेले स्वीय कर्मचारी वर्गामधील परिचर सोडून इतर कर्मचारी वर्ग संबंधित जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभागामधील एकुण मंजूर पदांमधून उपलब्ध करुन देण्यात यावेत. तसेच अध्यक्षांकडील परिचरांना सामान्य प्रशासन विभागामधील परिचराचे मंजूर पदांमधून आणि उपाध्यक्ष व इतर विषय समितीचे पदाधिका-यांकडील परिचरांना संबंधीत विभागातील परिचराचे मंजूर पदामधून उपलब्ध करुन देण्यात यावे, आणि ही जबाबदारी संपूर्णपणे संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची आहे. त्याचप्रमाणे पंचायत समित्यांच्या पदाधिका-यांसाठी देण्यात आलेले कर्मचारी वर्ग संबंधित पंचायत समितीमधील एकुण मंजूर पदामधून उपलब्ध करुन देण्यात यावेत आणि ही जबाबदारी संपूर्णपणे पंचायत समितीचे गट विकास अधिका-यांची आहे.

४] जिल्हा परिषदांचे पदाधिका-यांच्या कार्यालयातील टंकलेखनाचे काम सामान्य प्रशासन विभागातील कनिष्ठ सहाय्यक किंवा विषय समिती सभापतींच्या संबंधीत विभागातील कनिष्ठ सहाय्यक यांचेकडून पार पाडण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-xxx
[ चं. म. अलेगांव ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

....0000....

१६७० (१६५९०?)
क्र. सिंजिप/साप्रवि/आस्था-१/८०१/ /९७
सामान्य प्रशासन विभाग,
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग - ओरोस
दिनांक :- १५.४.१९९७ / १७

प्रत माहितीसाठी सविनय सादर.
१] मा. अध्यक्ष /उपाध्यक्ष, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग.
२] मा. सभापती, विषय समिती [सर्व] जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
३] मा. सभापती/उप सभापती , पं.स. [सर्व]

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१] खाते प्रमुख , जिल्हा परिषद सिंधुदुर्ग [सर्व]
२] गट विकास अधिकारी, पंचायत समिती [सर्व]
३] गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती [सर्व]

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदुर्ग करिता..